# राजर्षी शाहूंना

## समजून घेताना..!



संपादक
प्रा. कपिल अ. राजहंस

अनुक्रम


१. **संपादकीय... / ०७**
प्रा. कपिल राजहंस

२. **राजर्षी शाहू महाराज : जीवन आणि कार्य / १७**
कल्याण श्रावस्ती

३. **राजर्षी शाहू छत्रपती आणि**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ऋणानुबंध / ३६**
प्रा. सागर मा. कांबळे

४. **सत्यशोधक समाज आणि**
**राजर्षी शाहू महाराजांची भूमिका / ४५**
प्रा. डॉ. सोमनाथ डी. कदम

५. **छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य / ५३**
प्रा. ममता कन्नाडे

६. **स्त्री उध्दाराचे उद्‌गाते : शाहू महाराज / ५८**
डॉ. सबिहा फरास

७. **राजर्षी शाहू महाराजांचे**
**कृषी आणि उदयोग–व्यापार विषयक धोरण / ६२**
प्रा. धनंजय चंदनशिवे

८. **राजर्षी शाहू महाराजांचे**
**आंतरजातीय विवाहाविषयक विचार / ७९**
डॉ. वैशाली चौगुले

९. **राजर्षी शाहू महाराज : व्यक्ती आणि कार्य / ८३**
अरुण आलेवार

१०. **राजर्षी शाहू महाराज : अलौकिक व्यक्तिमत्त्व / ९३**
राम धुमाळ

# छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य

प्रा. ममता कन्नाडे

आधुनिक महाराष्ट्राच्या आणि भारताच्या शैक्षणिक, सामाजिक व सर्वांगीण क्रांतीचे उद्गाते व शिल्पकार, सामाजिक समतेचे पुरस्कर्ते, अस्पृश्यतेला काळीमा पुसणारे, विद्येचे पुजारी गुणीजनांचे व कलावंताचे आश्रयदाते, हरितक्रांतीचे जनक, बहुजन समाजाचे महान दैवत, थोर विचारवंत, संस्थानिकांचे मेरूमणी, ब्राह्मणेत्तर व सत्यशोधक चळवळीचे आश्रयदाते आधुनिक महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाचे एक महान मानकरी आणि थोर महामानव राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कारकिर्दीत महाराष्ट्र अभ्युदयाची पायाभरणी केली.

धर्मसुधारणेच्या आणि सामाजिक परिवर्तनाच्या कालखंडात छत्रपती शाहू महाराजांचा जन्म झाला होता पण महाराज कोणत्याही एका व्यक्तीचे किंवा पंथाचे अनुयायी बनले नाहीत. त्यांची विचारसरणी स्वतंत्र होती. शाहू महाराजांनी आयुष्यभर आपल्या प्रजेसाठी व संस्थानासाठी जे काही केले त्यावरून त्यांच्यामध्ये मुळातच प्रजेबद्दल तळमळ होती असे दिसते. लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांनी विविध क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. समाज उन्नतीसाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक उन्नती बरोबरच सामाजिक प्रगतीसाठी ही शाहू महाराजांचे कार्य महत्वपूर्ण आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.